RNI No. MAHBIL /2009/35530

सत्यमेव जयते

# महाराष्ट्र शासन राजपत्र

## असाधारण भाग चार

वर्ष १०, अंक १७] शुक्रवार, सप्टेंबर ६, २०२४/भाद्रपद १५, शके १९४६ [पृष्ठे ३, किंमत : रुपये २३.००

असाधारण क्रमांक ४२

**प्राधिकृत प्रकाशन**

**महाराष्ट्र विधानमंडळाचे अधिनियम व राज्यपालांनी प्रख्यापित केलेले अध्यादेश व केलेले विनियम.**

अनुक्रमणिका


| | |
|---|---|
| **सन २०२४ चा महाराष्ट्र अध्यादेश क्रमांक ७.—** महाराष्ट्र झाडे तोडण्याबाबत (नियमन) अधिनियम, १९६४ यात आणखी सुधारणा करण्यासाठी अध्यादेश. . . . . . . | **पृष्ठे** १-३ |


**महसूल व वन विभाग**

मंत्रालय, मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरू चौक,

मुंबई ४०० ०३२, दिनांक ६ सप्टेंबर २०२४.

MAHARASHTRA ORDINANCE No. VII OF 2024.

AN ORDINANCE FURTHER TO AMEND THE MAHARASHTRA FELLING OF TREES (REGULATION) ACT, 1964.

**सन २०२४ चा महाराष्ट्र अध्यादेश क्रमांक ७.**

**महाराष्ट्र झाडे तोडण्याबाबत (नियमन) अधिनियम, १९६४ यात आणखी सुधारणा करण्यासाठी अध्यादेश.**

**ज्याअर्थी,** राज्य विधानमंडळाच्या दोन्ही सभागृहांचे अधिवेशन चालू नाही;

१९६४ चा महा. ३४. **आणि ज्याअर्थी,** यात यापुढे दिलेल्या प्रयोजनांकरिता, महाराष्ट्र झाडे तोडण्याबाबत (नियमन) अधिनियम, १९६४, यात आणखी सुधारणा करण्यासाठी महाराष्ट्राच्या राज्यपालांनी तात्काळ कार्यवाही करणे जीमुळे आवश्यक व्हावे अशी परिस्थिती अस्तित्वात असल्याबद्दल त्यांची खात्री पटली आहे;

**त्याअर्थी, आता,** भारताच्या संविधानाच्या अनुच्छेद २१३ च्या खंड (१) द्वारे प्रदान केलेल्या अधिकारांचा वापर करून, महाराष्ट्राचे राज्यपाल, याद्वारे, पुढील अध्यादेश प्रख्यापित करीत आहेतः—

संक्षिप्त नाव व प्रारंभ.

**१.** (१) या अध्यादेशास, महाराष्ट्र झाडे तोडण्याबाबत (नियमन) (सुधारणा) अध्यादेश, २०२४, असे म्हणावे.

(२) तो, तात्काळ अंमलात येईल.

सन १९६४ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ३४ याच्या कलम २ ची सुधारणा.

**२.** महाराष्ट्र झाडे तोडण्याबाबत (नियमन) अधिनियम, १९६४ (यात यापुढे ज्याचा निर्देश, "मुख्य अधिनियम" असा केला आहे), याच्या कलम २ मध्ये,— १९६४ चा महा. ३४.

(१) खंड (इ) ऐवजी, पुढील खंड दाखल करण्यात येईल :—

"(इ) "झाड तोडणे" यामध्ये, झाड मारून टाकण्यासाठी किंवा त्याचा नाश करण्यासाठी झाड जाळणे किंवा कापणे किंवा छाटणे किंवा बुंध्या भोवतालची साल कोरणे (गर्डलिंग) किंवा झाडाची साल काढणे यांचा समावेश होतो;";

(२) खंड (ग) ऐवजी, पुढील खंड दाखल करण्यात येईल :—

"(ग) "नागरी क्षेत्र" याचा अर्थ, ज्या महानगरपालिका क्षेत्रासाठी मुंबई महानगरपालिका अधिनियम किंवा महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम या अन्वये महानगरपालिका घटित करण्यात आली आहे असे महानगरपालिका क्षेत्र, किंवा महाराष्ट्र नगरपरिषदा, नगरपंचायती व औद्योगिक नगरी अधिनियम, १९६५ याच्या कलम २ च्या खंड (२४) च्या अर्थांतर्गत असलेले असे नगरपालिका क्षेत्र, असा आहे, आणि त्यामध्ये, ज्या क्षेत्रासाठी महाराष्ट्र प्रादेशिक नियोजन व नगररचना अधिनियम, १९६६ याच्या कलम ४० अन्वये विशेष नगररचना प्राधिकरणाची रचना किंवा नेमणूक करण्यात आली आहे अशा अधिसूचित क्षेत्राचा किंवा ज्या नवीन नगरासाठी महाराष्ट्र प्रादेशिक नियोजन व नगररचना अधिनियम, १९६६ याच्या कलम ११३ अन्वये विकास प्राधिकरणाची रचना करण्यात आली आहे अशा नवीन नगराची जागा म्हणून निर्देशित करण्यात आलेल्या क्षेत्राचा समावेश होतो;".

१८८८ चा ३.
१९४९ चा ५९.
१९६५ चा महा. ४०.
१९६६ चा महा. ३७.
१९६६ चा महा. ३७.

सन १९६४ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ३४ याच्या कलम ४ ची सुधारणा.

**३.** मुख्य अधिनियमाच्या कलम ४ मधील, "तो, कलम ३ अन्वये शक्ती प्रदान केलेल्या" या मजकुराने सुरू होणाऱ्या आणि "एक हजार रुपयांहून अधिक नसेल इतक्या दंडाच्या शिक्षेस पात्र होईल," या मजकुराने संपणाऱ्या मजकुराऐवजी, पुढील मजकूर दाखल करण्यात येईल :—

"तो, पन्नास हजार रुपये इतक्या दंडास पात्र असेल. कलम ३ अन्वये अधिकार प्रदान केलेला वृक्ष अधिकारी, चौकशी केल्यानंतर आणि अशा व्यक्तीस बाजू मांडण्याची संधी दिल्यानंतर, दंड लादील;".

## निवेदन

महाराष्ट्र राज्यातील विवक्षित झाडांचे परीरक्षण करण्यासाठी अशी झाडे तोडण्याचे नियमन करण्याकरिता अधिक चांगली तरतूद करण्याबाबत महाराष्ट्र झाडे तोडण्याबाबत (नियमन) अधिनियम, १९६४ (१९६४ चा महा. ३४) अधिनियमित केला आहे. तो, नागरी क्षेत्र वगळून संपूर्ण महाराष्ट्र राज्यास लागू आहे.

२. उक्त अधिनियमाच्या कलम ४ मध्ये, वृक्ष अधिकाऱ्याच्या परवानगीशिवाय झाड तोडल्यास एक हजार रुपयांपेक्षा अधिक नसेल इतक्या दंडाची तरतूद केली आहे. उक्त एक हजार रुपयांच्या दंडाच्या कमाल मर्यादेत १९६४ पासून कोणतीही वाढ करण्यात आलेली नाही. दंडाच्या या अत्यंत किरकोळ रकमेमुळे, झाडांची अनधिकृत तोडणी करण्याच्या घटनांमध्ये मोठ्या प्रमाणात वाढ झाली आहे. पर्यावरणाचे रक्षण करण्यासाठी झाडे तोडण्याचे प्रभावी नियमन करणे आवश्यक आहे. त्यामुळे, झाडांची अनधिकृत तोडणी केल्याबद्दल कठोर दंडाची तरतूद करणे आवश्यक आहे. म्हणून, झाड तोडल्याबद्दल पन्नास हजार रुपये इतक्या दंडाची रक्कम निश्चित करण्यासाठी तरतूद करण्याच्या दृष्टीने, उक्त अधिनियमाच्या कलम ४ मध्ये सुयोग्य सुधारणा करणे इष्ट आहे असे वाटते.

३. उक्त अधिनियमामधील आणि महाराष्ट्र (नागरी क्षेत्रे) झाडांचे संरक्षण व जतन अधिनियम, १९७५ (१९७५ चा महा. ४४) यामधील "नागरी क्षेत्र" या संज्ञेची व्याख्या भिन्न असल्यामुळे ते लागू असण्यासंबंधात संदिग्धता निर्माण होते. म्हणून, सन १९७५ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ४४ यामध्ये तरतूद केलेल्या व्याख्येसारखीच व्याख्या असावी म्हणून, उक्त अधिनियमामधील उक्त संज्ञेच्या व्याख्येऐवजी, नवीन व्याख्या दाखल करणे प्रस्तावित केले आहे.

४. राज्य विधानमंडळाच्या दोन्ही सभागृहांचे अधिवेशन चालू नाही आणि उपरोक्त प्रयोजनांसाठी महाराष्ट्र झाडे तोडण्याबाबत (नियमन) अधिनियम, १९६४ (१९६४ चा महा. ३४), यात आणखी सुधारणा करण्याकरिता, महाराष्ट्राच्या राज्यपालांनी तात्काळ कार्यवाही करणे जीमुळे आवश्यक व्हावे, अशी परिस्थिती अस्तित्वात असल्याबद्दल त्यांची खात्री पटली आहे, म्हणून, हा अध्यादेश प्रख्यापित करण्यात येत आहे.

मुंबई,
दिनांक ५ सप्टेंबर २०२४.

**सी. पी. राधाकृष्णन,**
महाराष्ट्राचे राज्यपाल.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

**श्री. वेणुगोपाल रेड्डी,**
शासनाचे प्रधान सचिव.

ON BEHALF OF GOVERNMENT PRINTING, STATIONERY AND PUBLICATION, PRINTED AND PUBLISHED BY DIRECTOR, RUPENDRA DINESH MORE, PRINTED AT GOVERNMENT CENTRAL PRESS, 21-A, NETAJI SUBHASH ROAD, CHARNI ROAD, MUMBAI 400 004 AND PUBLISHED AT DIRECTORATE OF GOVERNMENT PRINTING, STATIONERY AND PUBLICATIONS, 21-A, NETAJI SUBHASH ROAD, CHARNI ROAD, MUMBAI 400 004. EDITOR : DIRECTOR, RUPENDRA DINESH MORE.